# मे. मोरेक्स इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नं.१८, सर्व्हे नं.१२३, वाडा इंडस्ट्रीयल डेव्हलमेंट कॉर्पोरेशन हमरापूर, ता. वाडा, जि. पालघर या कंपनीचे प्रस्तावित विस्तारीकरणाविषयक जाहीर जनसुनावणीचे इतिवृत्त

केंद्रीय वने, पर्यावरण व हवामान बदल विभाग, भारत सरकार यांचे पर्यावरण आघात मूल्यांकन (इ.आय.ए.) अधिसूचना २००६, दि. १४/०९/२००६ च्या तरतुदीनुसार मे. मोरेक्स इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नं.१८, सर्व्हे नं.१२३, वाडा इंडस्ट्रीयल डेव्हलमेंट कॉर्पोरेशन हमरापूर, ता. वाडा, जि. पालघर महाराष्ट्र यांचे प्रस्तावित प्रकल्पाच्या सध्याच्या प्लँट आणि मशीनरीचे रिव्यामपिंग आणि रेट्रोफिटिंग करुन अनसॅच्युरेटेड पॉलिस्टर रेझिनची क्षमता ४२ मे.ट./महिना वरुन १२०० मे.ट./महिना पर्यंत वाढविण्याबाबत पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीसाठी उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्याण-३ येथे दि. २१/०२/२०२४ रोजी अर्ज प्राप्त झाला होता. त्या अनुषंगाने सदर उद्योगाची पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी आयोजित करण्याकरिता मा. सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचेकडे उप प्रादेशिक कार्यालय महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ कल्याण-३ यांजकडून प्रस्ताव सादर केला होता. त्यानुसार मा. सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे कार्यालयीन आदेश क्रं. ई-१४३/२०२३, पत्र क्र.BO/JD(WPC)/PH/B-240711-FTS-0023, दि. ११.०७.२०२४ अन्वये उप-प्रादेशिक कार्यालय कल्याण-३ या कार्यालयास पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी घेण्याचे निर्देश देण्यात आले. सदर प्रकल्पाचे प्रस्तावित प्रकल्पाबाबत पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी खालील अधिकाऱ्यांच्या पॅनेलची नियुक्ती करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| १) | **जिल्हा न्याय दंडाधिकारी, पालघर**<br>किंवा अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी दर्जाच्या कमी<br>नाही असे त्यांचा प्रतिनिधी | **अध्यक्ष** |
| २) | **महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रतिनिधी**<br>प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्याण | **सदस्य** |
| ३) | **उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्याण-३** | **संयोजक** |

सदर निर्देशानुसार जाहीर जनसुनावणीचे अध्यक्ष मा. जिल्हा न्याय दंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी, पालघर यांच्या मान्यतेने त्यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २४.०७.२०२४ रोजी सकाळी ११.०० वा. मे.मोरेक्स इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नं. १८, सर्व्हे नं.१२३, वाडा इंडस्ट्रीयल डेव्हलमेंट कॉर्पोरेशन हमरापूर, ता. वाडा, जि.पालघर या उद्योगाचा कारखाना परिसर येथे पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर जनसुनावणीची जाहीर सूचना सुनावणीच्या एक महिना आधी दिनांक २०/०६/२०२४ रोजी मराठी दैनिक "सकाळ" व इंग्रजी दैनिक "द फ्री प्रेस जर्नल" या वर्तमानपत्रामध्ये प्रकाशित करण्यात आली होती. पर्यावरण आघात मुल्यांकनाचा अहवाल व कार्यकारी सारांश यांच्या प्रती मराठी व इंग्रजी भाषेमध्ये खालील ठिकाणी सर्वांच्या अवलोकनार्थ उपलब्ध करुन देण्यात आले होते.

१. पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासन भवन, १५ वा माळा, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
२. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पॉईंट, तिसरा मजला, शिव (पूर्व), मुंबई- ४०० ०२२.
३. प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम मध्य विभाग, तळमजला, पूर्व विंग, नविन सचिवालय इमारत, सिव्हिल लाईन्स, नागपूर.
४. जिल्हाधिकारी- पालघर, जि. पालघर.
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर.
६. उप विभागीय अधिकारी, ता. वाडा, जि. पालघर.

कृ.मा.प.

७. प्रादेशिक अधिकारी कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्याण.
८. तहसिलदार, वाडा तहसिल कार्यालय, जि. पालघर.
९. गट विकास अधिकारी, पंचायत समिती वाडा, ता. वाडा, जि. पालघर
१०. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, उद्योग भवन, पालघर, जि. पालघर
११. सरपंच, ग्रुप ग्रामपंचायत हमरापूर, ता.वाडा, जि. पालघर

तसेच वर्तमानपत्रातील जाहीर सूचनेद्वारे पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीचा मूळ उद्देश, प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस सदर प्रकल्पाविषयी माहिती, प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पास बंधनकारक असणाऱ्या प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा यांची माहिती सामान्य जनतेस देणे, त्यांनी दिलेल्या सूचनांचा विचार करणे, याबाबबत परिसरातील नागरिक, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, पर्यावरण तज्ञ यांनी प्रकल्पाबाबत आक्षेप, सूचना, लेखी अथवा तोंडी स्वरुपात अथवा ई-मेलद्वारे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास व इतर संबंधित कार्यालयास कळवाव्यात असे आवाहन करण्यात आले होते. त्यानुसार सदर प्रकल्पाबाबत उप-प्रादेशिक कार्यालय कल्याण-३ येथे ०१ सूचना ई-मेलद्वारे प्राप्त झाली होती (प्रत सोबत).

मे.मोरेक्स इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नं. १८, सर्व्हे नं.१२३, वाडा इंडस्ट्रीयल डेव्हलमेंट कॉर्पोरेशन हमरापूर, ता. वाडा, जि. पालघर या उद्योगाचे पर्यावरण विषयक जनसुनावणी मा.अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी, जि.पालघर यांच्या उपस्थितीत दि. २४.०७.२०२४ रोजी सकाळी ११.२८ वाजता सुरु करण्यात आली. सदर सुनावणीस लोकप्रतिनिधी, उद्योगाचे प्रतिनिधी, स्थानिक स्वराज्य संस्थेचे अधिकारी, वृत्तपत्र/ वृत्तवाहिनीचे प्रतिनिधी, पर्यावरण तज्ञ, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी व परिसरातील सामान्य नागरीक असे एकूण २८ प्रतिनिधी उपस्थित होते, याबाबतची यादी सोबत जोडलेली आहे. तसेच या जनसुनावणीस खालील अधिकारी उपस्थित होते.

१. मा.श्री. गोविंद मा. बोडके, अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी, पालघर जिल्हा
२. डॉ. राजेंद्र आ. राजपूत, सदस्य तथा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्याण
३. डॉ.सीमा उदय दळवी, संयोजक तथा उप-प्रादेशिक अधिकारी, कल्याण-३
४. श्री. संजीव रेदासनी, क्षेत्र अधिकारी, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्याण
५. श्री. जयप्रकाश भुसारा, क्षेत्र अधिकारी, उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्याण-३

संयोजक तथा उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्याण-३ यांनी मा.अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी, जि.पालघर यांच्या परवानगीने जनसुनावणीबाबत प्रस्तावना सादर केली आणि प्रकल्प प्रवर्तकास प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक तांत्रिक बाबींसंदर्भात पॉवरपॉईंटचे (PPT) सादरीकरण करण्यास विनंती केली.

त्यानुसार प्रकल्प प्रवर्तक यांनी मे.मोरेक्स इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड यांचे प्रस्तावित प्रकल्पाचे पॉवरपॉईंट (पी.पी.टी.) सादरीकरणासह तपशिलवार माहिती सर्वांच्या निदर्शनास आणून दिली. प्रकल्पाच्या सादरीरकरणा नंतर उपस्थित जनसमुदायास सदर प्रकल्पाबाबत कोणाला काही सूचना, हरकती, प्रश्न उपस्थित करावयाचे असतील तर त्यांनी मांडण्यासाठी आयोजकातर्फे आवाहन करण्यात आले तसेच जनसुनावणी दरम्यान लेखी सूचना द्यावयाच्या असतील तर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रतिनिधीकडे दाखल करण्यास सांगितले.

त्यानुसार खालीलप्रमाणे उपस्थितांकडून सूचना, हरकती, प्रश्न उपस्थित करण्यात आले व त्याप्रमाणे प्रकल्प प्रवर्तकाने सविस्तर अभिप्राय दिले :-

१) **श्री. निलेश पडवले, रा. करळगाव, ता. वाडा, जि. पालघर-** या कंपनीमुळे हवेचे प्रदूषण होईल काय?

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की, सद्य:स्थितीत कंपनीमध्ये एल.पी.जी. म्हणजे ग्रीन फ्युअलचे वापर करीत असल्यामुळे हवेचे प्रदूषण होणार नाही. याव्यतिरिक्त हवेचे प्रदूषण टाळण्यासाठी ३० मीटर उंचीच्या चिमणीची व्यवस्था करण्यात येणार आहे, त्यामुळे हवेचे प्रदूषण होणार नाही.

२) **श्री. अनिल सांबरे, रा. करळगाव, ता.वाडा, जि. पालघर-** या कंपनीमुळे जमिनीवर आणि जमिनीच्या पाण्यामध्ये प्रदूषण होईल का?

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की, या कंपनीच्या प्रकल्पाचे विस्तारीकरणामध्ये शुन्य द्रव निस्सारण (Zero Liquid Discharge) संकल्पना स्विकारलेली असून प्रकल्पातून कुठल्याही प्रकारचे दूषित पाणी/पदार्थ निर्मित झाल्यानंतर सदर दूषित पाणी/पदार्थ कोठेही जमिनीवर अथवा नदीमध्ये सोडले जाणार नाही. त्यामुळे जमिनीवर किंवा पाण्यामध्ये प्रदूषण होणार नाही.

३) **श्री. समीर संजय जाधव, रा. गुहिर, ता.वाडा, जि. पालघर-** कंपनीच्या आजुबाजूच्या परिसरात किती झाडे लावलेले आहेत?

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की, या कंपनीच्या आजुबाजूच्या परिसरात ५० झाडे लावलेली आहेत व काही झाडांचे संवर्धनदेखील केलेले आहे. तसेच प्रकल्प परिचालनानंतर सी.ई.आर. अंतर्गत आणखीन झाडे लावण्यात येतील. त्यामुळे परिसरातील प्रदूषण कमी करण्यास व टाळण्यास मदत होईल.

**श्री. समिर जाधव, ता. वाडा, जि. पालघर-** प्रकल्प परिचालनानंतर किती झाडे लावण्यात येतील?

प्रकल्प प्रवर्तक यांनी म्हटले की, प्रकल्प परिचालनानंतर दरवर्षी १०० झाडे लावण्यात येतील.

४) **श्री.विशाल सांबरे, रा. करळगाव, ता. वाडा, जि. पालघर-** या कंपनीमुळे कंपनीतील व इतर लोकांच्या आरोग्यावर परिणाम होईल का?

प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, या कंपनीतील वायुप्रदूषणामुळे लोकांच्या आरोग्यावर परिणाम होणार नाही याची दक्षता घेतली जाईल. तसेच वेळोवेळी आरोग्य सुविधा केंद्राद्वारे किंवा आरोग्य शिबीराद्वारे लोकांच्या अरोग्यावर परिणाम होईल का याची तपासणी करण्यात येईल. त्यामुळे कंपनीमुळे कुठल्याही लोकांच्या आरोग्यावर परिणाम होणार नाही.

५) **श्री. विशाल रघुनाथ धानवा, रा. शालतरे, ता.वाडा, जि. पालघर-** या कंपनीच्या आजुबाजूच्या परिसरावर परिणाम होईल का?

प्रकल्प प्रवर्तकांनी म्हटले की, आजुबाजूच्या परिसरावर काहीही परिणाम होणार नाही. कंपनीकडून हवेचे प्रदूषणाची निगा राखली आहे, पाण्याचे प्रदूषण होऊ नये यासाठी शुन्य द्रव निस्सारण (Zero Liquid Discharge) संकल्पना स्विकारलेली आहे व ध्वनी प्रदूषण होऊ नये याचीही काळजी घेतली जाणार आहे. त्यामुळे कंपनीच्या आजुबाजूच्या परिसरावर कोणतेही परिणाम होणे अपेक्षित नाही.

६) **श्री. रोहित पडवले, रा. करळगाव, ता. वाडा, जि. पालघर-** कंपनीकडून ट्रकचा वापर वाढल्यामुळे वाहतूक वाढून त्याचा परिणाम होणार का?

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की, प्रकल्पाच्या विस्तारीकरणाअंतर्गत कच्चा माल आणि पक्क्या मालाच्या वातहुकीसाठी दररोज फक्त २ ते ३ ट्रकची आवश्यकता असल्यामुळे त्याचा वाहतुकीवर परिणाम होणार नाही.

कृ.मा.प.

७) **श्री. अजय चौधरी, उपसरपंच, ग्रामपंचायत हमरापूर, ता. वाडा, जि. पालघर-** कंपनीतील सांडपाणी व इतर पदार्थाची विल्हेवाट कशा प्रकारची असणार आहे, त्यासाठी काय सुविधा असेल?

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की, पॉवरपॉईट सादरीकरणामध्ये नमूद केल्याप्रमाणे कंपनीमध्ये घरगुती सांडपाणी आणि औद्योगिक सांडपाणी असे दोन प्रकारच्या सांडपाण्याची निर्मिती होते. त्यापैकी औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शनानुसार शुन्य द्रव निस्सारण (Zero Liquid Discharge) संकल्पना स्विकारलेली असल्यामुळे कंपनीबाहेर कुठलेही दूषित पाणी/पदार्थ सोडले जाणार नाही. तसेच कंपनीने औद्योगिक सांडपाणी प्रायमरी टँकमध्ये जमा करुन त्याचे बाष्पीभवन करण्यात येणार आहे व बाष्पीभवनानंतर सदर पाण्याचे पुनर्वापर करण्यात येईल. त्यामुळे भुपृष्ठावर अथवा भूजलावर परिणाम होणार नाही.

**श्री. अजय चौधरी, उपसरपंच, ग्रामपंचायत हमरापूर, ता. वाडा, जि. पालघर-** कंपनीमधील सांडपाण्याची साठवण क्षमता (Storage Capacity) पुरेशी आहे काय?

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की, सांडपाण्याच्या प्रक्रियेसाठी ई.टी.पी. यंत्रणा बसविलेली असून त्याची क्षमता महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक तत्वानुसार असेल व त्याची वेळोवेळी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून तपासणीदेखील होत असते.

**श्री. अजय चौधरी, उपसरपंच, ग्रामपंचायत हमरापूर, ता. वाडा, जि. पालघर-** महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक तत्वानुसार ई.टी.पी. यंत्रणा बसविली जाते परंतु पुढे त्याची योग्य अंमलबजावणी होते किंवा नाही हे बघणे महत्वाचे आहे. तसेच आजुबाजूच्या शेतकऱ्यांना सांडपाण्याची व इतर पदार्थांमुळे प्रदूषणाचा त्रास होऊ नये याची काळजी घ्यावी ही विनंती.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की, कंपनीतील सांडपाण्यावर प्रक्रिया योग्य रितीने होते किंवा नाही याबाबत दर सहा महिन्याला पर्यावरणीय अहवाल सादर करावा लागतो, त्याकरीता महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून वारंवार भेटी होत असल्याने कंपनीकडून योग्य ती खबरदारी घेतली जाते.

**श्री. अजय चौधरी, उपसरपंच, ग्रामपंचायत हमरापूर, ता. वाडा, जि. पालघर-** या कंपनीसंदर्भात शेतकऱ्यांनी ग्रामपंचायतीकडे तक्रार केली तर त्याबाबत काय कार्यवाही करण्यात येईल?

प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, या कंपनीसंदर्भात कोणाचीही तक्रार असेल तर सर्वप्रथम तक्रारदाराने प्रकल्पधारकांना भेटावे. प्रकल्पधारक जर ऐकत नसतील तर ते महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे तक्रार देऊ शकतात व त्यानंतर म.प्र.नि.मंडळाकडून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

**श्री. अजय चौधरी, उपसरपंच, ग्रामपंचायत हमरापूर, ता. वाडा, जि. पालघर-** सी.ई.आर. कार्यक्रमाअंतर्गत सोलार दिवे व इतर कोणत्या सुविधा देण्यात येतील?

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की, कंपनीचे सामाजिक आर्थिक बांधिकली अंतर्गत सी.एस.आर आणि सी.ई.आर दोन प्रकारचे योजना असून सी.एस.आर निधी कंपनीच्या नफ्यामधून २ टक्के रक्कम दरवर्षी खर्च करण्यात येतो आणि सी.ई.आर. निधी प्रकल्पाच्या बांधकामापासून ते परिचालनापर्यंत एकदाच खर्च केला जातो.

कृ.मा.प.

८) **श्री. संदिप जयराम गोवारी, माजी सरपंच तथा विद्यमान सदस्य, ग्रामपंचायत हमरापूर, ता. वाडा. जि. पालघर-** ग्रामपंचायतीचे विद्यमान उपसरपंच श्री. अजय चौधरी यांनी विचारल्याप्रमाणे आमच्या भागामध्ये २ ते ३ लिक्वीडच्या कंपन्या असून त्यांच्याबाबत प्रदूषण नियंत्रणाच्या तक्रारी दिल्यानंतर कार्यवाही झाल्याचे निदर्शनास आले नाही. अशा प्रकारच्या तक्रारीसंदर्भात म.प्र.नि.मंडळाकडून भेटीला येताना किमान दोन दिवस आधी कळवावे, जेणेकरुन संबंधित तक्रारीवर योग्य ती कारवाई झाली किंवा नाही सगळयांना समजेल. तसेच कंपन्या आल्यामुळे सी.एस.आर. निधीतून गावाच्या विकासाला चालना मिळते त्यामुळे कंपन्या याव्यात असे आमचे मत आहे. तरी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून तक्रारीच्या भेटीदरम्यान ग्रामपंचायतीला सोबत घेण्यात यावे ही विनंती.

**उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कल्याण-३ तथा संयोजक -** ही पर्यावरणविषयक जनसुनावणी असल्याने मुख्यत्वेकरुन पर्यावरणविषयक मुद्दयांचा विचार होईल असे म्हटले.

**मा. अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी, पालघर जिल्हा-** कोणत्याही तक्रारीची चौकशी करतांना, तक्रारदार ग्रामपंचायत असेल अथवा इतर नागरिक, ज्यांची तक्रार आहे त्यांना नोटीस देऊन बोलावणे आवश्यक आहे अशा सूचना दिल्या.

**मा. अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी, पालघर जिल्हा-** सध्या अस्तित्वात प्रकल्पामध्ये किती लोकांना रोजगार मिळतो आणि त्यामध्ये किती स्थानिक आहेत. तसेच सगळे कर्मचारी कुशल आहेत की अकुशल?

प्रकल्प प्रवर्तक यांनी म्हटले की, सध्या कंपनीमध्ये ३० लोकांना रोजगार दिले असून सर्व लोक स्थानिक आहेत. त्यापैकी ३० टक्के कुशल, ३० टक्के अर्धकुशल आणि उर्वरित अकुशल आहेत.

**मा. अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी, पालघर जिल्हा-** प्रकल्पाचे परिचालन झाल्यानंतर किती लोकांना रोजगार दिले जाईल?

प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, प्रकल्पाचे परिचालन झाल्यानंतर १० ते १२ लोकांना रोजगार देण्यात येईल आणि त्यांना सहा महिन्याचे प्रशिक्षण देण्यात देऊन कुशल करण्यात येईल.

**मा. अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी, पालघर जिल्हा-** कामगारांच्या सुरक्षिततेबाबत काय सुविधा आहे, कोणत्या रुग्णालयात ई.एस.आय. सुविधा पुरविली जाते?

प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, कंपनीतील कामगारांना पी.एफ. आणि ई.एस.आय. सुविधा देण्यात येते. कंपनीतील कामगारांना मनोर मधील स्थानिक वैद्यकीय अधिकारी आणि पालघर जिल्हा रुग्णालयातून इ.एस.आय. सुविधा पुरविली जाते.

**निष्कर्ष** : जनसुनावणीमध्ये लोकप्रतिनिधी, स्थानिक स्वराज्य संस्थेचे अधिकारी, ग्रामस्थ, व्यवसायिक सहभागी झाले होते आणि त्यांनी प्रकल्पाच्या संदर्भात अपेक्षा व आक्षेप व्यक्त केले. संयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी, कल्याण- ३ यांनी सांगितले की, मा.अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी, जि. पालघर व जनसुनावणी समितीचे सदस्य, प्रकल्प प्रवर्तक यांचेकडून लोकप्रतिनिधी व गावकरी यांचा पर्यावरणविषयक बाबींचा विरोध, सूचना, अपेक्षा

कृ.मा.प.

इत्यादींबाबतची नोंद घेतली आहे. शेवटी संयोजक तथा उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्याण-३ यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून मा.अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी, जि. पालघर यांच्या मान्यतेने जनसुनावणीची प्रक्रिया संपन्न झाल्याचे जाहीर केले.

**डॉ. सीमा उदय दळवी**
समितीचे संयोजक आणि
उप-प्रादेशिक अधिकारी, कल्याण-३
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्याण

**डॉ. राजेंद्र आ. राजपूत**
समितीचे सदस्य आणि
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्याण

**( गोविंद मा. बोडके )**
समितीचे अध्यक्ष आणि
जिल्हाधिकारी, पालघर जिल्हा